पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)

# प्रेसनोट दि.२४/१०/२०२२

## गुंडा विरोधी पथकाचे कारवाईत सराईत गुन्हेगारांकडुन ०३ गावठी पिस्तुले व ०९ जिवंत काडतुसे जप्त

"पोलीस अभिलेखावरील आरोपी खंडु कालेकर याने त्याचे मित्रासह मध्यप्रदेश येथुन ०६ गावठी पिस्तुले व जिवंत काडतुसे आणलेली असुन त्याची विक्री करण्यासाठी तो त्याचे साथीदारासह डांगे चौक, थेरगाव, पुणे येथे येणार असले बाबत गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखेचे सहा.पो.निरीक्षक एच.व्ही.माने यांना मिळालेल्या बातमीनुसार डांगे चौकाजवळ, ताथवडेरोड, थेरगाव, पुणे येथुन सराईत गुन्हेगार नामे १) खंडु अशोक कालेकर, वय २४ वर्षे, रा. काले कॉलनी, पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे २) अक्षय ऊर्फ दादा साहेबराव सुर्वे, वय २४ वर्षे, रा. स्वप्निल संकुल सोसायटी, फलॅट नं. ५०३, आनंद लॉन्स जवळ, भुगाव, ता. मुळशी, जि. पुणे व ३) शुभम गणेश खडके, वय २२ वर्षे, रा. विघ्नहर्ता पार्क सोसायटी, ता. मुळशी, जि. पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन ०३ देशी बनावटीचे पिस्तुल, ०१ मॅगझीन व ०९ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तसेच इसम नामे ४) तुषार ऊर्फ आप्पा गोगावले रा. नवले ब्रिजजवळ, मुंबई बॅंगलोर हायवे, वडगाव बुा, पुणे याने वर नमुद आरोपींकडुन ०३ पिस्तुले व १२ जिवंत काडतुसे विकत घेतल्याचे निष्पन्न झाल्याने वाकड पोलीस ठाणे येथे भारतीय शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन त्याचा शोध चालु आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त, डॉ. श्री. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, डॉ. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. प्रशात अमृतकर, सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मच्छिंद्र पंडीत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट ४, गुन्हे शाखा अतिरीक्त कार्यभार गुंडा विरोधी पथक, एच.व्ही. माने, सहायक पोलीस निरीक्षक, गुंडा विरोधी पथक, अंबरीश देशमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक, शस्त्र विरोधी पथक तसेच गुंडा विरोधी पथकाचे पोलीस अंमलदार - हजरत पठाण, प्रविण तापकिर, विक्रमसिंग जगदाळे, सोपान ठोकळ, विजय गंभिरे, सुनिल चौधरी, मयुर दळवी, नितीन गेंगजे, शाम बाबा, विजय तेलेवार, शभम कदम, राम मोहीते व तौसिफ शेख यांनी केली आहे.

(मच्छिंद्र पंडीत)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट-४ (अतिरीक्त कार्यभार)
गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं.चिं.